०८

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९१८, २५५७७९०५
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.new.srapune.gov.in

जा.क्र./ झोपुप्रा/तां.२/३२८०/२०२४
दिनांक :-१७/१२/२०२४.

परिपत्रक :- ०९/२०२४

विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा फलक योजनाक्षेत्रात ठळकरित्या प्रसिद्ध करणेबाबत.

संदर्भ :- कार्यालयीन परिपत्रक क्र. ४० दि. ११/१२/२०१०.

महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.प्रा.-२००४/ प्र. क्र. - २१३/ झोपसू - १, दि. ३० जून २००५ अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास अधिनियम, १९७१ च्या कलम ३अ) मधील तरतुदीनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची अंमलबजावणी करणेसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली.

२) झोपडपट्ट्यांची संख्या व त्या पुनर्वसित करण्यासाठी दाखल होणारे प्रस्ताव विचारात घेता झोपडपट्टी क्षेत्रात पुनर्वसन इमारतीचे बांधकाम चालू असलेल्या ठिकाणी विकसकांनी विहीत नमुन्यात माहितीफलक लावलेला आहे किंवा नाही हे पाहणे अत्यंत आवश्यक असल्याने उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये परिपत्रक जारी करण्यात आलेले आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

(A) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असताना योजनेसंबंधीची माहिती झोपडीधारकांना तसचे नागरिकांना व्हावी आणि योजनेची अंमलबजावणी पारदर्शकपणे करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्यापूर्वी बांधकामाबाबतचा सविस्तर तपशील दर्शविणारा फलक योजना क्षेत्राच्या दर्शनी भागामध्ये राहील. सदर फलकाचा आकार व फलकावर नमूद करावयाचा तपशील सोबतच्या जोडपत्र-अ मध्ये दर्शविणेत आलेला आहे. सदरचा फलक हा विकसकाने योजना क्षेत्रात दर्शनी ठिकाणी लावून त्याचे छायाचित्र या कार्यालयास सादर केलेनंतर, जोते तपासणी वेळी उप अभियंता / नगर रचनाकार यांनी खात्री करूनच योजनेचा जोते तपासणी दाखला प्रस्तावित करावा.

(B) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पुनर्वसन इमारतीच्या दर्शनी ठिकाण झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचेमार्फत

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे बांधकाम करण्यात आल्याबाबतची कोनशिला विकसकाने लावणे आवश्यक राहिल. सदर फलकाचा आकार व फलकावर नमूद करावयाचा तपशील सोबतच्या जोडपत्र - ब मध्ये दर्शविण्यात आलेला आहे.

(C) प्राधिकरणाचे बोधचिन्ह (Logo) इमारतीच्या दर्शनी भागावर सर्वोच्च ठिकाणी विकसकाने लावणे आवश्यक राहिल. त्याचा तपशील सोबतच्या जोडपत्र-क मध्ये दर्शविण्यात आलेला आहे.

(D) सदर बाबींची पूर्तता विकसकाने पुनर्वसन घटकाच्या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी करणे अनिवार्य करण्यात येत आहे. सदरचा फलक हा विकसकाने लावल्याची खात्री करूनच पुनर्वसन घटकाच्या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी. सदरची अट प्रमाणपत्रात समाविष्ट करण्यात यावी.

३) उपरोक्त सूचना सर्व संबंधितांवर बंधनकारक असून त्याबाबतची पडताळणी सर्व संबंधितांनी करावी आणि सदर बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ सर्व संबंधितांनी करावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झो.पु.प्रा., पुणे.
17.12.24

सोबत :- जोडपत्र अ, ब, क.

जोडपत्र 'अ' (माहिती फलक)

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

| | | |
|---|---|---|
| 1 | योजनेचे नाव | |
| 2 | विकसकाचे नाव<br>SRA नोंदणी क्रमांक<br>RERA नोंदणी क्रमांक | |
| 3 | वास्तुविशारदचे नाव | |
| ४ | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील प्रशासकीय मान्यता | |
| ५ | झोपडपट्टी वासियांसाठी उपलब्ध केलेली संक्रमण व्यवस्था | |
| ६ | भूखंडाचा स.नं./सि.स.नं. | |
| ७ | भूखंडाचे क्षेत्रफळ | |
| ८ | भूखंडाचा मालकी हक्क तपशील | |
| ९ | मंजूर पुनवर्सन इमारती | |
| १० | मंजूर पुनर्वसन सदनिका | |
| ११ | मुक्त विक्री घटकांतर्गत मंजूर बांधकाम क्षेत्र | |
| १२ | पुनर्वसन घटकांतर्गत इमारतीचे बांधकाम पूर्ण होण्याचा अपेक्षित दिनांक | |

विकसक

आकार-4'0"x3'0" रंग-ब्यॅकग्राउंड-निळे, अक्षरे-पांढरा

FINAL

जोडपत्र - 'ब' (कोनशिला)

# महाराष्ट्र शासन

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

१) योजनेचे नाव :-

२) विकसकाचे नाव :-

३) आर्किटेक्टचे नाव :-

४) बांधकाम सुरू दिनांक :-

५) बांधकाम पूर्ण दिनांक :-

आकार - ४' ०''  रंग - ग्रॅनाइट / मार्बल,  अक्षरे - गोल्डन इंबोसिंग.

जोडपत्र 'क' (प्राधिकरणाचे बोधचिन्ह)




FINAL